# शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, नंदुरबार

**नविन प्रशासकीय इमारत, टोकर तलाव रोड, नंदुरबार कार्यालय दुरध्वनी 02564-210240**

**Email Id- eoprimary2@gmail.com**

जिपनं/प्राशि/खाप्राशा/स्वयअर्थ/प्रप/कावि297/2019 नंदुरबार दि. 17/11/2018

प्रति,

**अध्यक्ष/सचिव**
**क्रिएटिव्ह फाऊंडेशन**
**शहादा ता. शहादा**
**जि. नंदुरबार**

**विषयः- स्वयंअर्थसहाय्यीत शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत**
**क्रिएटिव्ह इंटरनॅशनल स्कुल डोंगरगाव ता. शहादा जि. नंदुरबार**

**संदर्भः-** 1) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012
2) शासन निर्णय क्र.एसएफएस-1018/प्रक्र1260/एसएम-2/मुंबई-32 दि.19/10/2018
3) मा.शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग नाशिक यांचेकडील इरादा पत्र शिउस/नावि/प्राथ-2/स्वअसशा/नवीन/23101/02/18 दि.25.10.2018
4) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, शहादा यांचेकडील प्रस्ताव दि. 24/10/2018

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती शहादा ता.जि. नंदुरबार यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार **क्रिएटिव्ह इंटरनॅशनल स्कुल डोंगरगाव या** स्वयंअर्थ सहाय्यीत इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेस खालील अटीवर आणि तपासणी अहवालातील सर्व सुचनांची परिणामकारक रित्या अंमलबजावणी करण्याच्या खालील अटी व शर्तीवर सन 2018-19 पासून स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावर **इ. 1 ली** या इयत्तेस प्रथम मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

1. नविन स्वयंअर्थसहाय्यीत प्राथमिक उच्च प्राथमिक वर्गांना स्वयंअर्थ सहाय्यीत तत्वावर प्रथम मान्यता देण्यांत आलेली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
2. विविध निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करण्यांत यावी.
3. शैक्षणिक शुल्क विविध कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यांत यावी.
4. विहीत संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश देणेत यावे.
5. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतूदींचे शाळा पालन करील
6. शाळा नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना , पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थ्यी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
7. परिच्छेद 3 निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाचा कलम 12(2) नुसार प्रतिपुर्ती मिळेल.अशी प्रतीपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते उघडावे लागेल.
8. संस्था शाळा कोणत्याही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांचा माता पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
9. शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश/ सुचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
10. सदरची प्रथम मान्यता हि उपरोक्त संदर्भ क्र.1, 2 व 3 मध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यांत येत आहे. अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यांत येईल.

सदर मान्यता उपरोक्त अटी व शर्तीना अधिन राहून व सादर केलेल्या कागदपत्रांच्या अधिन राहून देण्यांत येत आहे.

(डॉ. राहुल चौधरी)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नंदुरबार

प्रत - गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती शहादा जि.नंदुरबार

MANAGER
CREATIVE INTERNATIONAL SCHOOL
Dongargaon,Tal.Shahada,Dist.Nandurbar

Principal
CREATIVE INTERNATIONAL SCHOOL
Dongargaon,Tal.Shahada,Dist.Nandurbar

**वर्ग मान्यता आदेश**
**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर**

जिल्हा परिषद नंदुरबार
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जाक्र.जिपनं/प्राशि/खाप्राशा/कावि/३८४/१९
नंदुरबार दिनांक :२७/०८/२०१९

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक
क्रिएटिव्ह इंटरनॅशनल स्कुल,
डोंगरगांव ता. शहादा जि. नंदुरबार

विषय :- मान्यताप्राप्त कायम विना अनुदानीत खाजगी प्राथमिक
शाळांना नैसर्गिक वाढीने वर्ग/तुकडया मंजूर करणे बाबत

संदर्भ :- १) क्र. व्हीएलएस/१००२/ (१०००/०२)प्राशि-३ मुंबई -३२ दि. २३/९/२००३
२) अध्यक्ष क्रिएटिव्ह फाऊंडेशन शहादा यांचेकडील पत्र दि.२१/०८/२०१९

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र १ अन्वये मराठी/इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानीत खाजगी प्राथमिक शाळाना कायम विना अनुदान तत्वावर इ. २ री ते ७ वी पर्यंतच्या नैसर्गिक वाढीने वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजूरीचे अधिकार शिक्षणाधिकारी यांना प्रदान करण्यांत आले आहेत.

संदर्भ क्र. २ अन्वये प्राप्त प्रस्तावान्वये क्रिएटिव्ह इंटरनॅशनल स्कुल, डोंगरगांव ता. शहादा जि. नंदुरबार या स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरु असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेस नैसर्गिक वाढीने शासन निर्णयानुसार विहीत वर्गातील पटसंख्या/उपस्थिती यात सातत्य टिकविण्याच्या तसेच प्रशिक्षीत (डी.एड.अर्हताधारक) शिक्षक नेमण्याच्या अटीवर या आदेशान्वये कायम विना अनुदान तत्वावर वर्ग सुरु करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

| अ. क्र | इयत्ता | पट संख्या | नविन मंजूर वर्ग संख्या | अनुदानाचा प्रकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ री | ३७ | एक | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर | सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासुन इ. २ री चा वर्ग कायम विना अनुदानीत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मंजुर |

**अटी व शर्ती**

१) वर्ग/तुकडयांची विद्यार्थी संख्या कमी झाल्यास त्या वर्ग व तुकडया बंद करण्यांत येतील.
२) वरील वर्ग व तुकडया उघडल्याने परिसरातील प्राथमिक शाळांतील वर्ग व तुकडयांवर परिणाम होणार नाही.
३) संस्थेने रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र दिले आहे त्यानु सार सदर वर्गास कायम विना अनुदानीत तत्वावर परवानगी देणेत येत आहे.
४) सदर वर्गासाठी भविष्यात अनुदानाची मागणी करता येणार नाही .
५) शाळेस शासनाची वर्ग मान्यता घेतल्याशिवाय वरचे वर्ग सुरु करता येणार नाही व शाळेत प्रशिक्षीत शिक्षकांची नेमणूक करणे बंधनकारक राहील.
६) उपरोक्त वर्ग/तुकडयांसाठी स्वतंत्र वर्ग/खोल्यांची व पुरेशा भौतिक सुविधांची सोय आवश्यक आहे.

**(मच्छिंद्रनाथ कदम)**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद,नंदुरबार**

प्रत :- म.शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर
प्रत :- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती शहादा ता. शहादा जि.नंदुरबार यांना माहिती व कार्यवाहीसाठी

MANAGER
CREATIVE INTERNATIONAL SCHOOL
Dongargaon,Tal.Shahada,Dist.Nandurbar

Principal
CREATIVE INTERNATIONAL SCHOOL
Dongargaon,Tal.Shahada,Dist.Nandurbar

**वर्ग मान्यता आदेश**
**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर**

जिल्हा परिषद नंदुरबार
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जाक्र.जिपनं/प्राशि/खाप्राशा/कावि/३०१/२०
नंदुरबार दिनांक :-१०/०९/२०२०

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक
क्रिएटिव्ह इंटरनॅशनल स्कुल,
डोंगरगांव ता. शहादा जि. नंदुरबार

विषय :- मान्यताप्राप्त कायम विना अनुदानीत खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीने वर्ग/तुकडया मंजूर करणे बाबत
संदर्भ :- १) शासन निर्णय व्हीएलएस/१००२/ (१०००/०२)प्राशि-३ मुंबई -३२ दि. २३/९/२००३
२) प्राचार्य क्रिएटिव्ह इंटरनॅशनल स्कुल शहादा यांचेकडील पत्र दि.२१/०८/२०१९

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र १ अन्वये मराठी/इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानीत खाजगी प्राथमिक शाळाना कायम विना अनुदान तत्वावर इ. २ री ते ७ वी पर्यंतच्या नैसर्गिक वाढीने वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजूरीचे अधिकार शिक्षणाधिकारी यांना प्रदान करण्यांत आले आहेत.

संदर्भ क्र. २ अन्वये प्राप्त प्रस्तावान्वये क्रिएटिव्ह इंटरनॅशनल स्कुल, डोंगरगांव ता. शहादा जि. नंदुरबार या स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरु असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेस नैसर्गिक वाढीने शासन निर्णयानुसार विहीत वर्गातील पटसंख्या/उपस्थिती यात सातत्य टिकविण्याच्या तसेच प्रशिक्षीत (डी.एड.अर्हताधारक) शिक्षक नेमण्याच्या अटीवर या आदेशान्वये कायम विना अनुदान तत्वावर वर्ग सुरु करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

| अ. क्र | इयत्ता | पट संख्या | नविन मंजूर वर्ग संख्या | अनुदानाचा प्रकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३ री | २३ | एक | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर | सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासुन इ. ३ री चा वर्ग कायम विना अनुदानीत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मंजुर |

**अटी व शर्ती**

१) वर्ग/तुकडयांची विद्यार्थी संख्या कमी झाल्यास त्या वर्ग व तुकडया बंद करण्यांत येतील.
२) वरील वर्ग व तुकडया उघडल्याने परिसरातील प्राथमिक शाळांतील वर्ग व तुकडयांवर परिणाम होणार नाही.
३) संस्थेने रु.१००/- च्या स्टँम्पपेपरवर हमीपत्र दिले आहे त्यानु सार सदर वर्गास कायम विना अनुदानीत तत्वावर परवानगी देणेत येत आहे.
४) सदर वर्गासाठी भविष्यात अनुदानाची मागणी करता येणार नाही .
५) शाळेस शासनाची वर्ग मान्यता घेतल्याशिवाय वरचे वर्ग सुरु करता येणार नाही व शाळेत प्रशिक्षीत शिक्षकांची नेमणूक करणे बंधनकारक राहील.
६) उपरोक्त वर्ग/तुकडयांसाठी स्वतंत्र वर्ग/खोल्यांची व पुरेशा भौतिक सुविधांची सोय आवश्यक आहे.

10/09/2020
**(बी. आर. रोकडे)**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद,नंदुरबार**

प्रत :- म.शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर
प्रत :- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती शहादा ता. शहादा जि.नंदुरबार यांना माहिती व कार्यवाहीसाठी

SPatel
MANAGER
CREATIVE INTERNATIONAL SCHOOL
Dongargaon,Tal.Shahada,Dist.Nandurbar

Principal
CREATIVE INTERNATIONAL SCHOOL
Dongargaon,Tal.Shahada,Dist.Nandurbar

**वर्ग मान्यता आदेश**
**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर**

जिल्हा परिषद नंदुरबार
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जाक्र.जिपनं/प्राशि/खाप्राशा/कावि/ ३८ /२०२१
नंदुरबार दिनांक :- ०३/०२/२०२१

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक
क्रिएटिव्ह इंटरनॅशनल स्कुल,
डोंगरगांव ता. शहादा जि. नंदुरबार

**विषय :- मान्यताप्राप्त कायम विना अनुदानीत खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीने वर्ग/तुकडया मंजूर करणे बावत.**

**संदर्भ :-** १) शासन निर्णय व्हीएलएस/१००२/ (१०००/०२)प्राशि-३ मुंबई -३२ दि. २३/९/२००३
२) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२
३) शासन निर्णय क्र. एसएफएस-१०१८/प्र.क्र.१२६०/एसएर्म-२ दि. १९/१०/२०१८
४) मा.शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील इरादापत्र क्र.शिउसं/नावि/प्राथ-२/स्वअसशा/नवीन/२०१८/२३१०१/०२ दि. २५/१०/२०१८
५) प्राचार्य, क्रिएटीव्ह इंटरनॅशनल स्कुल,शहादा यांचेकडील प्रस्ताव दि.२१/०८/२०१९
६) मा. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक :- संकीर्ण-४७१९/प्र.क्र.४४५/एसएम-२/ दि. ०५ नोव्हेंबर, २०२०
७) या कार्यालयाची मंजुर टिपणी दि. ०३/०२/२०२१

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र १ अन्वये मराठी/इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानीत खाजगी प्राथमिक शाळाना कायम विना अनुदान तत्वावर इ. २ री ते ७ वी पर्यंतच्या नैसर्गिक वाढीने वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजूरीचे अधिकार शिक्षणाधिकारी यांना प्रदान करण्यांत आले आहेत.

संदर्भ क्र. २ वरील अधिनियमान्वये संदर्भ क्र. ३ वरील शासन निर्णयानुसार क्रिएटिव्ह इंटरनॅशनल स्कुल, डोंगरगांव ता. शहादा जि. नंदुरबार या शाळेस प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, राज्यमंडळ) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरु करण्यास मान्यता प्राप्त झालेली आहे. संदर्भ क्र. ४ अन्वये मा. शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील इरादापत्रान्वये सदर शाळेस सन २०१८-१९ पासून इयत्ता १ ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, (राज्यमंडळ) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार या कार्यालयाकडील दि. १७/०१/२०१८ रोजीच्या आदेशान्वये शाळेस प्रथम मान्यता प्रदान करण्यात येऊन सन २०१८-१९ पासून इ. १ ली चा वर्ग सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली असून या कार्यालयाकडील दि. २७/०८/२०१९ रोजीच्या आदेशान्वये सन २०१९-२० पासून इ. २ री चा वर्ग आणि दि.१०/०९/२०२० रोजीच्या आदेशान्वये सन २०२०-२१ पासून इ. ३ री चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु करणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापि, संदर्भ क्र. ५ वरील प्रस्तावात नमुद केलेनुसार संस्थेने सद्यस्थितीत सदर शाळेचे इ.७ वी पर्यंत वर्ग सुरु आहेत. त्यानुसार संदर्भ क्र. ३ व ४ अन्वये सदर शाळेस इ. १ ली ते १२ वी (प्राथमिक ते उच्च माध्यमिक) पर्यंतच्या राज्य मंडळाच्या वर्गांना (सर्व शाखा) मान्यता प्राप्त असल्याने आणि शाळेस सद्यस्थितीत इ. १ ली ते ७ वी चे वर्ग सुरु असल्याने संदर्भ क्र. १ वरील शासन निर्णयानुसार विहीत वर्गातील पटसंख्या/उपस्थिती यात सातत्य टिकविण्याच्या तसेच प्रशिक्षीत (डी.एड.अर्हताधारक) शिक्षक नेमण्याच्या अटीवर या आदेशान्वये स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खालीलप्रमाणे वर्ग सुरु करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

| अ. क्र | इयत्ता | पट संख्या | नविन मंजूर वर्ग संख्या | अनुदानाचा प्रकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४ थी | २३ | एक | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर | सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासुन इ. ४ थी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मंजुर |
| २ | ५ वी | २४ | एक | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर | सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासुन इ. ५ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मंजुर |
| ३ | ६ वी | २१ | एक | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर | सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासुन इ. ६ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मंजुर |
| ४ | ७ वी | २० | एक | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर | सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासुन इ. ७ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मंजुर |

त्याचप्रमाणे शाळेने इ. ८ वी चा वर्ग सुरु केल्यास त्या वर्गाच्या पटसंख्येनुसार नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच इ. ९ वी ते १२ वी (माध्यमिक व उच्च माध्यमिक) वर्गांच्या

मान्यतेकामी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नंदुरबार यांचेशी स्वतंत्र पत्रव्यवहार करुन पुढील मान्यतेच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणे संस्थेस/ शाळेस बंधनकारक राहील या अटीस व पुढील अटी शर्तीच्या अधिन राहुन शाळेस इ. ४ थी ते ७ वी च्या वर्गास मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

१) वर्ग/तुकडयांची विद्यार्थी संख्या कमी झाल्यास त्या वर्ग व तुकडया बंद करण्यांत येतील.
२) वरील वर्ग व तुकडया उघडल्याने परिसरातील प्राथमिक शाळांतील वर्ग व तुकडयांवर परिणाम होणार नाही.
३) संस्थेने रु.१००/- च्या स्टँम्पपेपरवर हमीपत्र दिले आहे त्यानुसार सदर वर्गास स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर परवानगी देणेत येत आहे.
४) सदर वर्गासाठी भविष्यात अनुदानाची मागणी करता येणार नाही .
५) शाळेस शासनाची वर्ग मान्यता घेतल्याशिवाय वरचे वर्ग सुरु करता येणार नाही व शाळेत प्राथमिक ते उच्च प्राथमिक वर्गांसाठी RTE नुसार व माध्यमिक ते उच्च माध्यमिक वर्गांसाठी शालेय शिक्षण विभागाचे शासन निर्णय, महाराष्ट्र खाजगी शाळा सेवाशर्ती नियमावली १९८१ नुसार प्रशिक्षीत शिक्षकांची नेमणूक करणे बंधनकारक राहील.
६) उपरोक्त वर्ग/तुकडयांसाठी स्वतंत्र वर्ग/खोल्यांची व पुरेशा भौतिक सुविधांची सोय आवश्यक आहे.
७) सदर शाळेच्या नावाच्या फलकावर तसेच विद्यार्थ्यांचे शाळा सोडल्याच्या दाखल्यावर शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर असल्याचा उल्लेख असणे बंधनकारक राहील.

3/II/2021

(डॉ. राहुल चौधरी)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,नंदुरबार

प्रत :- म.शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर
प्रत :- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती शहादा ता. शहादा जि.नंदुरबार यांना माहिती व कार्यवाहीसाठी

**MANAGER**
CREATIVE INTERNATIONAL SCHOOL
Dongargaon,Tal.Shahada,Dist.Nandurbar

**Principal**
CREATIVE INTERNATIONAL SCHOOL
Dongargaon,Tal.Shahada,Dist.Nandurbar

**वर्ग मान्यता आदेश**
**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर**

जिल्हा परिषद नंदुरबार
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जाक्र.जिपनं/प्राशि/खाप्राशा/कावि/ ४७५/२०२१
नंदुरबार दिनांक :-२० /०९/२०२१

**प्रति,**
**प्राचार्य/मुख्याध्यापक**
**क्रिएटिव्ह इंटरनॅशनल स्कुल,**
**डोंगरगांव ता. शहादा जि. नंदुरबार**

**विषय :- इंग्रजी माध्यमाच्या स्वयंअर्थसहाय्यित शासन मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेस नैसर्गिक वाढीने वर्ग/तुकडया मंजूर करणे बाबत.**

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२
२) शासन निर्णय क्र. एसएफएस-१०१८/प्र.क्र.१२६०/एसएम-२ दि. १९/१०/२०१८
३) मा.शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील इरादापत्र क्र.शिउसं/ नावि/प्राथ-२/स्वअसशा/नवीन/२०१८/२३१०१/०२ दि. २५/१०/२०१८
४) प्राचार्य, क्रिएटीव्ह इंटरनॅशनल स्कुल,शहादा यांचेकडील प्रस्ताव दि.०२/०७/२०२१

उपरोक्त विषयास अनुसरुन आपल्या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, राज्यमंडळ) या वर्गांसाठी संदर्भ क्र. २ अन्वये शासन मान्यता प्राप्त असून संदर्भ क्र. ३ अन्वये मा. शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील इरादापत्रान्वये सन २०१८-१९ पासून इयत्ता १ ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, (राज्यमंडळ) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार या कार्यालयाकडील दि. १७/०१/२०१८ रोजीच्या आदेशान्वये शाळेस प्रथम मान्यता प्रदान करण्यात येऊन सन २०१८-१९ पासून इ. १ ली चा वर्ग सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली असून या कार्यालयाकडील दि.२७/०८/२०१९ रोजीच्या आदेशान्वये सन २०१९-२० पासून इ. २ री चा वर्ग आणि दि.१०/०९/२०२० रोजीच्या आदेशान्वये सन २०२०-२१ पासून इ. ३ री चा वर्ग त्याचप्रमाणे दि. ०३/०२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून इ. ४ ते ७ वी पर्यंतच्या वर्गांना नैसर्गिक वाढीने मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापि, संदर्भ क्र. ४ वरील प्रस्तावात नमुद केलेनुसार संस्थेने सद्यस्थितीत सदर शाळेचे इ.८ वी पर्यंत वर्ग सुरु आहेत. त्यानुसार संदर्भ क्र. २ व ३ अन्वये सदर शाळेस इ. १ ली ते १२ वी (प्राथमिक ते उच्च माध्यमिक) पर्यंतच्या राज्य मंडळाच्या वर्गांना (सर्व शाखा) मान्यता प्राप्त असल्याने आणि शाळेस सद्यस्थितीत इ. १ ली ते ७ वी चे वर्ग सुरु असल्याने वर्गातील पटसंख्या/उपस्थिती यात सातत्य टिकविण्याच्या तसेच प्रशिक्षीत (डी.एड.अर्हताधारक) शिक्षक नेमण्याच्या अटीवर या आदेशान्वये स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खालीलप्रमाणे वर्ग सुरु करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

| अ. क्र | इयत्ता | पट संख्या | नविन मंजूर वर्ग संख्या | अनुदानाचा प्रकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ८ वी | २३ | एक | स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर | सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासुन इ. ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मंजुर |

**अटी व शर्ती**

१) वर्ग/तुकडयांची विद्यार्थी संख्या कमी झाल्यास त्या वर्ग व तुकडया बंद करण्यांत येतील.
२) वरील वर्ग व तुकडया उघडल्याने परिसरातील प्राथमिक शाळांतील वर्ग व तुकडयांवर परिणाम होणार नाही.
३) संस्थेने रु.१००/- च्या स्टँम्पपेपरवर हमीपत्र दिले आहे त्यानुसार सदर वर्गास स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर परवानगी देणेत येत आहे.
४) सदर वर्गासाठी भविष्यात अनुदानाची मागणी करता येणार नाही .
५) शाळेस शासनाची वर्ग मान्यता घेतल्याशिवाय वरचे वर्ग सुरु करता येणार नाही व शाळेत प्राथमिक ते उच्च प्राथमिक वर्गांसाठी RTE नुसार व माध्यमिक ते उच्च माध्यमिक वर्गांसाठी शालेय शिक्षण विभागाचे शासन निर्णय, महाराष्ट्र खाजगी शाळा सेवाशर्ती नियमावली १९८१ नुसार प्रशिक्षीत शिक्षकांची नेमणूक करणे बंधनकारक राहील.
६) उपरोक्त वर्ग/तुकडयांसाठी स्वतंत्र वर्ग/खोल्यांची व पुरेशा भौतिक सुविधांची सोय आवश्यक आहे.

MANAGER
CREATIVE INTERNATIONAL SCHOOL
Dongargaon,Tal.Shahada,Dist.Nandurbar

Principal
CREATIVE INTERNATIONAL SCHOOL
Dongargaon,Tal.Shahada,Dist.Nandurbar

(डॉ. राहुल चौधरी)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,नंदुरबार

प्रत :- मा.शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर
प्रत :- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती शहादा ता. शहादा जि.नंदुरबार यांना माहिती व कार्यवाहीसाठी